जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १६ दिनांक - ०८/०१/२०२५**

गुन्हे शाखा, युनिट-४, पुणे शहर.

## मोका गुन्हयात एक वर्षापासुन फरारी असलेल्या आरोपीच्या आवळल्या मुसक्या

दि.०८/०१/२०२४ रोजी गुन्हे शाखा, युनिट ४ चे पथक चतुःश्रृंगी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना **पोलीस अंमलदार जहांगीर पठाण व विशाल इथापे** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सुमारे एक वर्षापुर्वी मारहाण करुन दहशत करुन पळुन गेलेला इसम मोन्या ऊर्फ प्रज्योत बाळकृष्ण उमाळे हा गाडी अड्डा, दत्तमंदीराजवळ, खडकी बाजार, पुणे येथे बसलेले आहे.अशी बातमी मिळाल्याने बातमी प्रमाणे खात्री करुन कारवाई करणेचे वरिष्ठांनी आदेश दिले.

मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता बातमीतील वर्णनाचा इसम हा गाडी अड्डा, दत्तमंदीराजवळ, खडकी बाजार, पुणे येथे बसलेला असल्याचे मिळुन आल्याने सदर इसमाला ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **मोन्या ऊर्फ प्रज्योत बाळकृष्ण उमाळे वय २३ वर्षे रा. राजीव गांधी नगर, घर नं.१९२ खडकी पुणे** असे सांगितले.त्यांचेकडे तपास करता, त्याने चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गु. रजि.न. ७५१/२०२३ भा.दं.वि.स. कलम ३०७, ३२३, १४१, १४३, १४४, १४७, १४८, १४९ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३) सह १३५ व महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे त्याचे साथीदारांसह केला असल्याची कबूली दिल्याने. त्यास पुढील कारवाई कामी सहा.पोलीस आयुक्त खडकी विभाग पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे,पुणे शहर श्री.शैलेश बलकवडे, मा पोलीस उप-आयुक्त गुन्हे,पुणे श्री. निखिल पिंगळे, मा.सहा. पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. राजेंद्र मुळीक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे, यांचे मार्गदर्शनात पोलीस उप निरीक्षक वैभव मगदुम, पोलीस अंमलदार प्रविण भालचीम, एकनाथ जोशी, विठ्ठल वाव्हळ, नागेश सिंगकुंवर, जहांगिर पठाण, विशाल ईथापे, देविदास वाढंरे, राहुल परदेशी, सुभाष आव्हाड, महिला पोलीस अंमलदार रोहिणी पांढरकर, मयुरी नलावडे, चालक सहा.पो.फौ.शितल शिंदे यांनी केली.